**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) अंतर्गत आदेश**

जा.क्र.सनिति/नियमन/कलम ८८-१/आदेश/ 882 /२०१८
कार्यालय :- सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तालुका तिरोडा
दिनांक :- २६/०३/२०१८

**वाचा क्र.** १. श्री ए.डि.रामटेके लेखापरीक्षक श्रेणी-२ सहकारी संस्था गोंदिया यांनी या कार्यालयास सादर केलेले स्व. कमलाबाई ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था म. बोरा र.नं. ८१३ ता.तिरोडा या संस्थेचा फेरलेखापरीक्षण अहवाल सन २०१० ते २०१६ दिनांक ०७/०८/२०१७

२. मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गोंदिया यांचे कार्या. पत्र क्र. २२१२/२०१८ दिनांक २३/०३/२०१८

---

ज्याअर्थी स्व.. कमलाबाई ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था म. बोरा र.नं. ८१३ ता.तिरोडा (जिचा पुढे संस्था म्हणुन उल्लेख करण्यात आलेले आहे) हि सहकारी संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ याचे तरतुदीं अंतर्गत नोंदणी करण्यात आलेली सहकारी संस्था असुन तिची नोंदणी क्र. ८१३ असा आहे आणि सदर संस्थेची उपविधी खात्यामार्फत म्हणजे केलेली आहे आणि

ज्या सदर संस्थेचे कामकाज सहकारी कायदा , नियम, मंजुर उपविधी व खाताच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सुचना यांचे अधीन राहुन चालविणे अभिप्रेत आहे आणि

संस्थेचे सन २०१० ते २०१६ या वर्षाचे फेरलेखापरीक्षण पुर्ण झालेले आहे. संस्थेचे लेखापरीक्षकाने वरील वाचा क्र.१ नुसार लेखापरीक्षण अहवाल सादर केला असुन सदर अंकेक्षण अहवालानुसार अहवाल वर्षात संस्थेचे आर्थीक कामकाजात गंभीर दोष आढळुन आलेले आहेत. संस्थेचे संचालक मंडळाने संस्थेचे आर्थीक व प्रशासकीय बाबींवर दुर्लक्ष केल्यामुळे संस्थेचे आर्थीक नुकसान केल्याचे सकृत दर्शनी दिसुन येते. त्यामुळे संस्थेचा कामकाज व तिची आर्थीक स्थिती व याकरीता जबाबदार व्यक्तींची चौकशी करुन जबाबदारी निश्चीत करणे क्रमप्राप्त झाले आहे.

त्याअर्थी संस्थेचे सन २०१० ते २०१६ चे अंकेक्षण अहवालानुसार संस्थेला झालेल्या नुकसानीची व्याप्ती किती व त्यास जबाबदार कोण याबाबद चौकशी करुन वैयक्तीक व संयुक्त रित्या जबाबदारी निश्चीत करणे आवश्यक झाले आहे व अशी जबाबदारी निश्चीत करणे करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**//आदेश//**

महाराष्ट्र शासन सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई निर्णय क्र.सीएसएल/१४९३/११६२/सीआर-४७/१५-सी दिनांक ७ ऑगष्ट १९९३ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी प्रमोद प्र. हुमणे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका तिरोडा जिल्हा गोंदिया याद्वारे स्व. कमलाबाई ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था म. बोरा र.नं. ८१३ ता.तिरोडा जि.गोंदिया या संस्थेचे अध्यक्षांनी केलेले गैरव्यवहाराचे चौकशी करुन जबाबदारी निश्चीत करणे करीता श्री नानासाहेब ए. कदम, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था गोरेगांव जि.गोंदिया यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. चौकशी अधिकारी यांनी सोबत जोडलेले **परीशिष्ट "अ"** मध्ये नमूद केलेले मुद्यांवर सविस्तर चौकशी करुन तसा चौकशी अहवाल त्यांचे अभिप्रायासह तिन महिन्याचे आंत दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावे. तसेच चौकशी संदर्भात दाखल करुन घेतलेले पुरावे लेखी बयान इत्यादी सर्व कागदपत्रे सादर करावे. चौकशीचे खर्चाची जबाबदारी चौकशी अधिकाऱ्याने निश्चीत करावी.

**सदर आदेश आज दिनांक - २६ /०३/२०१८ रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.**

(प्रमोद प्र. हुमणे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था तालुका तिरोडा

प्रति,

१. श्री नानासाहेब ए. कदम, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था गोरेगांव जि.गोंदिया यांना सुचीत करण्यात येते की, त्यांनी सोबतच्या **परीशिष्ट "अ"** मध्ये नमूद मुद्यांचे अनुषंगाने संपुर्णपणे संस्थेचे कागदपत्रांची व संपुर्ण संचालक मंडळाची वैयक्तीक लेखी, बँक व याबाबदची सत्य परीस्थती पडताळणी चौकशी अहवालामध्ये कोण दोषी आहेत व त्याची मर्यादा काय आहे. याबाबद स्पष्ट चौकशी अहवाल तिन महिन्याचे आंत दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.

२. प्रशासक, स्व. कमलाबाई ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था म. बोरा र.नं. ८१३ ता.तिरोडा जि.गोंदिया यांना कळविण्यात येते की, चौकशीचे वेळी चौकशी अधिकारी यांना आवश्यक अभिलेख पुरविण्यात यावी.

**प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर**

१. ना.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था गोंदिया यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. ना. विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था गोंदिया यांना माहितोस्वत सविनय सादर.

27/03/18

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था तालुका तिरोडा